**विशेष दिवाणी दावा क्र. १७७/२०२५ मधील निशाणी २४ वरील आदेश.**

(कुंडलिक खोत वि. प्रकाश विरपन्ना चांभार कांबळे वैगेरे)

**(CNR No-MHSN02-001138-2025)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी त्यांची कैफीयत/म्हणणे दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन कैफीयत/म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. प्रस्तुत कामाची नोटीस प्रतिवादीस दिनांक ०८/०८/२०२५ रोजी बजावली आहे व दिनांक ०९/०९/२०२५ रोजी प्रस्तुत प्रतिवादी हे वकीलांमार्फत हजरही आहेत. परंतु प्रतिवादी क्र. २ या वयस्कर असुन त्यांचा मुलगा प्रतिवादी क्र. १ हे आजारी होते. प्रस्तुत प्रतिवादीस घर चालविण्याकरिता कामाला जावे लागते व कामावर सुट्टी टाकणे हे आर्थिक दृष्टया न झेपणारे असल्याने प्रतिवादी क्र. २ यांना सदर दाव्यास कैफियत देण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक ०७/१०/२०२५ रोजी विना म्हणणे आदेश झालेला आहे. तसेच प्रतिवादी क. ३ ते ४ या सांगली येथील रहिवाशी नसल्याने व सदर नोटीस दाव्याची व ताकीद अर्जाची प्राप्त झाल्यानंतर सदर कामातील प्रतिवादींनी याबाबतची माहिती स्वतःच्या आईला देऊन मांडण्यास सांगितले व दरम्यान प्रस्तुत प्रतिवादी हे परगावी घरगुती कारणामुळे गेली असल्याने या कामी म्हणणे देणे शक्य झाले नाही. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. सदरचा उशीर मारु होऊन विना म्हणणे झालेला आदेश रद्द करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी ३२ कडे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे या कामी संगणमताने सदरचे कामकाज

चालविणेस टाळाटाळ करत आहेत. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रस्तुतचा दावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेकरिता तसेच निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक वाटते. दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. तसेच, दावा गुणदोषावर चालून वादी–प्रतिवादी मधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच कैफीयत/म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून कैफीयत/म्हणणे नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे कैफीयत/म्हणणे दाखल करुन घेतल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. असे असताना, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांचेवर खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (निशाणी २४) मंजूर करण्यात आला.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रस्तुत प्रतिवादी यांनी वादींना रक्कम रु. ५००/– द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.03.12 18:00:22 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. ११/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.